# महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड

**सुधारीत याचिकेचा हेतू:-**

**वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या वार्षिक महसुली आवश्यकतेची जुळवणी; वित्तिय वर्ष २०१९-२० चे तरतूद स्वरुपातील (तात्पुरते) जुळवणी, आणि वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि २०२४-२५ साठी वार्षिक महसुली आवश्यकतेचा अंदाज**

**सादर केल्याचे स्थान:-**

**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

# कार्यकारी सारांश

## १. कार्यकारी सारांश

**प्रस्तावना**

१.१ वर्तमान याचिकेअंतर्गत असणारी पारेषण प्रणाली ही लोड फ्लोच्या अभ्यासावर आधारीत एसटीयूद्वारे आखण्यात आलेली असून ती वित्तिय वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ च्या एसटीयू नेटवर्क योजनेचा हिस्सा होती. ह्या परवाना मिळालेल्या पारेषण प्रणालीची स्थापना आणि कार्यान्वयन यांच्यासाठी महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड विद्युत पारेषण कंपनी लिमिटेड (एमईजीपीटीसीएल/याचिकाकर्ता) यांना आयोगाच्या आदेश दिनांकीत १४ सप्टेंबर, २०१० द्वारे पारेषण परवाना क्र. १ सन २०१० देण्यात आलेला आहे.

१.२ महाराष्ट्राच्या उत्तरपूर्व भागातील औष्णिक वीज प्रकल्पामधून निर्माण होणारी वीज राज्याच्या मध्य आणि पश्चिम भागातील लोड सेंटर्स कडे वाहून नेण्याकरिता परवानाधारक पारेषण प्रणालीची आवश्यकता होती. ३१ मार्च २०१५ पर्यंत टप्प्यांटप्प्यांने एमईजीपीटीसीएलचे यशस्वीरित्या कार्यान्वयन करुन कथित उद्दिष्ट पूर्ण करण्यात आलेले आहे.

१.३ कमर्शियल ऑपरेशन डेटच्या (व्यावसायिक कार्यान्वयन तारीख) आधारावर भाडेदराची निश्चिती करण्यासाठी संपूर्ण पारेषण प्रणालीचे वेगवेगळ्या सेट्समध्ये विभाजन करण्यात आले होते. हे कार्यान्वयनाचे वेळापत्रक अशाप्रकारे आखण्यात आले होते की यापैकी प्रत्येक सेट हा त्याच्या कार्यान्वयनाच्या तारखेपासून विजेचे पारेषण करण्याच्या दृष्टीने स्वतंत्ररीत्या सक्षम असेल आणि तो आंतरराज्य पारेषण प्रणालीचा (आयएनएसटीएस) एक महत्त्वाचा भाग होईल.

१.४ याचिकाकर्ता असे निवेदन करू इच्छितात की सन्माननीय आयोगाने केस क्र. ११२ सन २०१५ साठी दिलेल्या आदेश दिनांक ३०.०६.२०१६ द्वारे आपला परवाना क्र. १ सन २०१० मधील दुरुस्तीला ०४.०७.२०१७ रोजी मंजुरी दिलेली आहे. ह्या दुरुस्ती अन्वये याचिकाकर्त्याने तिरोडा आणि अकोला उपकेंद्रामध्ये १५०० एमव्हीएची एक एक अतिरिक्त आयसीटी बसविणे आवश्यक होते. याचिकार्त्याला मुख्य अभियंता (एसटीयू), एमएसईटीसीएल यांच्याकडून २७.०२.२०१७ रोजी असे पत्र मिळाले आहे की सीई (एसटीयू) यांचे कार्यालय वर्तमान आणि भविष्यकालीन परिस्थितीसाठी तिरोडा आणि अकोला-।। उपकेंद्र येथे ७६५ केव्हीप्रमाणे ७६५/४०० केव्ही आयसीटीच्या अतिरिक्त गरजेबाबत पुनरावलोकन करीत आहे आणि याचिकाकर्त्याला पुढील सूचना मिळेपर्यंत एमईजीपीटीसीएल यांच्या ७६५ केव्ही तिरोडा आणि अकोला-।। उपकेंद्र येथील अतिरिक्त ७६५/४०० केव्ही आयसीटीच्या संबंधित बांधकामाचे कामकाज थांबविण्याची विनंती करण्यात आली होती.

या संदर्भात सदर समस्येवर चर्चा करण्यासाठी एमएसईटीसीएल यांचे सन्माननीय अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक (सीएमडी) यांनी ३०.१०.२०१७ रोजी एक बैठक बोलविली होती. या भेटीदरम्यान सन्माननीय सीएमडी यांनी एमएसईटीसीएलचे क्षेत्रीय अधिकारी आणि एमईजीपीटीसीएलचे क्षेत्रीय अधिकारी यांना पुढील गोष्टींची खात्री/माहिती करुन घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत.

१) वरील दोन्ही उपकेंद्रावर आरआरएस स्किम उपलब्ध आहे काय?

२) असल्यास, ती मानवी (मुख्य बाजू व नियंत्रण बाजू यांच्याकडील जोडणी करणे आणि जोडणी खंडीत करणे समाविष्ट आहे काय, किंवा अर्धमानवी) सेमी मॅन्युअल (आयसोलेटर ऑपरेशन्स साठी कनेक्शन्स/डिसकनेक्शन्स यांचे संयुक्त रुप) स्वरुपाची आहे काय?

३) आणिबाणीची परिस्थिती निर्माण झाल्यास आरआरएस स्किम कसा प्रतिसाद देते?

४) एखाद्या नावीन्यपूर्ण योजनेच्या अंमलबजावणी द्वारे प्रतिसाद देण्यासाठी लागणारा वेळ कमीत कमी करणे शक्य आहे काय?

ह्या उपर याचिकर्त्याने २५.११.२०१७ या तारखेच्या पत्राद्वारे आपले उत्तर दिले असून त्याची प्रत सन्माननीय आयोगाकडे पाठविली आहे.

एसटीयूच्या गरजेनुसार याचिकाकर्ता याबाबतील पुढील कारवाई करील.

## वैधानिक तरतुदी

१.५ याचिकाकर्ते हे पारेषण परवानाधारक असल्यामुळे निर्देशित नियामक कार्यपद्धती अंतर्गत कामकाज करण्यात प्रयत्न करतात. पारेषण व्यवसायाचे खालील कायदे, धोरणे व नियमावल्या यांचा अंतर्गत अनुशासन व नियमन होते:

- विद्युत कायदा २००३;
- राष्ट्रीय विद्युत धोरण;
- राष्ट्रीय टॅरिफ पॉलिसी; आणि
- एमईआरसी (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, २०१५ व २०१९

१.६ सन्माननीय आयोगाने विद्युतनिर्मिती, पारेषण व वितरण यांचे टॅरिफ निश्चित करण्यासाठी ०१.०८.२०१९ रोजी एमवायटी रेग्युलेशन्स, २०१९ निर्देशित केले आहेत. रेग्युलेशन ५ (१) (ए) निर्देशित करतो की पारेषण परवानाधारकांकडून पुढील बाबींचा समावेश असणारी बहुवर्षीय टॅरिफ याचिका ('एमवायटी') ०१.११.२०१९ पर्यंत दाखल करण्यात आली पाहिजे:

ए) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स, २०१५ अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ यांचे ट्रुईंग अप:

बी) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहुवर्षीय टॅरिफ) रेग्युलेशन्स २०१५ अंतर्गत करण्यात यावयाचे वित्तिय वर्ष २०१९-२० चे तात्पुरते ट्रुईंग अप;

सी) एमईआरसी एमवायटी रेग्युलेशन्स, २०१९ अंतर्गत नियंत्रण कालावधी २०२०-२५ पर्यंतच्या प्रत्येक वर्षासाठी एकंदर महसुली आवश्यकता;

१.७ वरील गोष्टी विचारात घेता एमईजीपीटीसीएल पुढील गोष्टी सादर करीत आहे

ए) एमवायटी रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ यांच्या एआरआरच्या ट्रु-अपसाठी याचिका.

बी) एमवायटी रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपसाठी याचिका.

सी) एमवायटी रेग्युलेशन्स, २०१९ च्या तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०२०-२०२१ ते २०२४-२५ या वर्षांच्या एआरआरची निश्चिती.

डी) सन्माननीय एमईआरसी यांनी आपल्या १८.१२.२०१८ तारखेच्या आदेशाद्वारे केस क्र. १६९ सन २०१७ बाबत सन्माननीय एमईआरसी यांचा आदेश दिनांकीत १२.०९.२०१८ च्या विरुद्ध याचिकाकर्त्यांनी दाखल केलेल्या पुनरावलोकन याचिका क्र. ३०३ सन २०१८ वर निर्णय दिलेला आहे. सन्माननीय आयोगाने याचिकाकर्त्याने विचारलेल्या तीन समस्यांबाबत अंशत: मंजुरी दिलेली आहे. याचिकाकर्त्यांनी सन्माननीय एमईआरसी यांचा आदेश दिनांकीत १८.१२.२०१८ च्या अंमलबजावणीसाठी टॅरिफमध्ये सुधारणा करण्याबाबत आपला हिशेब (आकडेमोड) सादर केलेला आहे.

**ट्रु-अप, तात्पुरता ट्रु-अप आणि एआरआरचा सुधारीत अंदाज यांच्या हिशेबासाठी आधार**

१.८ याचिकाकर्त्याने केस क्र. ५० सन २०१६ व केस क्र. १६९ सन २०१७ मध्ये प्रत्यक्षात केलेल्या व दावा केलेल्या भांडवली खर्चाच्या आधारे वित्तिय वर्ष २०१७-१८ व वित्तिय वर्ष २०१८-१७ चे ट्रु-अप आणि वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरचे तात्पुरते ट्रु-अप एमईआरसी (एमवायटी) रेग्युलेशन्स, २०१५ च्या अनुसार निश्चित करण्यात आलेले आहे. वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या लेखापरिक्षित वार्षिक लेखा या **परिशिष्ट १ आणि परिशिष्ट २** मध्ये सादर करण्यात आल्या आहेत. एआरआरच्या ट्रु-अपसाठी विचारात घेतलेले घटक आहेत:

(ए) कार्यान्वयन व देखभाल खर्च

(बी) घसारा

(सी) भांडवली कर्जावरील व्याज

(डी) खेळते भांडवल व पारेषण प्रणाली वापरकर्त्यांच्या ठेवी यांच्यावरील व्याज

(ई) आयकर

(एफ) आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान

(जी) समभाग भांडवलावरील परतावा

(एच) बिगर-टॅरिफ उत्पन्न

(आय) रेग्युलेशन्समध्ये निर्देशित मर्यादेपर्यंत इतर व्यवसायातून उत्पन्न

(जे) नफा आणि नुकसान यांचा हिस्सा

(के) वहन खर्च (कॅरिंग कॉस्ट) आणि प्रोत्साहनपर राशी (इन्सेन्टिव्ह)

१.९ याचिकाकर्त्याने पुढील आधारांवर एआरआरचे ट्रु-अप काढलेले आहेत:

(एल) सीओडी नंतर संबंधित सेट्ससाठी असल्यास, अतिरिक्त भांडवली खर्चासह सीओडीच्या वेळेस सेट-१, सेट-२ए, सेट-२बी आणि सेट-३ खालील मालमत्तेसाठी याचिकाकर्त्याने प्रत्यक्ष केलेला व दावा केलेला भांडवली खर्च आणि एमवायटी २०११ चा रेग्युलेशन्स १०० आणि एमवायटी २०१५ चा रेग्युलेशन १०२ आणि इतर रेग्युलेशन्स यांच्या अंतर्गत असणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ह्या सन्माननीय आयोगाकडे असणाऱ्या अधिकारांच्या समावेशासह एमवायटी रेग्युलेशन्स २०११ आणि २०१५ च्या तरतुदी यांच्यावर आधारित वित्तिय वर्ष २०१७-१८ व वित्तिय वर्ष २०१८-१९ यांच्या एआरआरचे ट्रु-अप.

(एम) सन्माननीय आयोगाने २०१७-१८ पूर्वीच्या पारेषण प्रणालीच्या सर्व घटकांसाठी टॅरिफच्या तारीख सुरु करण्याला मंजुरी दिलेली आहे आणि त्यामुळे याचिकाकर्त्यांनी संच-निहाय (सेटवाईज) पद्धतीने नव्हे, तर संयुक्त पारेषण प्रणाली विचारात घेऊन एआरआरचे ट्रु-अप, एआरआरचे तात्पुरते ट्रु-अप आणि अंदाजे ट्रु-अप यांचा हिशेब केलेला आहे. याचिकाकर्ता सन्माननीय आयोगाला हे विचारात घेण्याची विनंती करीत आहे.

(एन) सीओडीच्या वेळेत करण्यात आलेला प्रत्यक्ष आणि दावा केलेला अतिरिक्त भांडवली खर्च आणि वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ साठी अतिरिक्त भांडवली खर्च आणि रेग्युलेशन १०० आणि इतर रेग्युलेशन यांच्या अंतर्गत असणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी ह्या सन्माननीय आयोगाकडे असणाऱ्या अधिकारांच्या समावेशासह एमवायटी रेग्युलेशन्स २०१५ च्या तरतुदींवर आधारित वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरचे तात्पुरते ट्रु-अप.

(ओ) रेग्युलेशन्स १०६ आणि इतर रेग्युलेशन्स यांच्या अन्वये अडचणी दूर करण्यासाठी या सन्माननीय आयोगाकडे असणाऱ्या अधिकारांचा समावेश असणाऱ्या एमवायटी रेग्युलेशन्स २०१९ च्या

तरतुदीनुसार वित्तिय वर्ष २०२०-२१ ते वित्तिय वर्ष २०२४-२५ नियंत्रण कालावधीसाठी एआरआरचा प्रक्षेपित करण्यात आलेला.

(पी) ३१ मार्च, २०२० पर्यंतचा वहन खर्च (कॅरिंग) खर्च पुढीलप्रमाणे आहे:

- वित्तिय वर्ष २०१७-१८ मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).
- वित्तिय वर्ष २०१८-१९ मधील वसुलीला मंजुरी देण्यासाठी झालेल्या विलंबामुळे नफा (तोटा) यांची जुळवणी केल्यानंतर मंजूर झालेला एआरआर आणि वास्तविक महसुली आवश्यकता यांच्यामधील फरकासाठी वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).
- आयएनएसटीएस अनुसार होणारी वसुली सप्टेंबर २०१८ पासून सुरु झाली आणि ३१.०३.२०१९ पर्यंत चालू राहिली. त्यामुळे एप्रिल- ऑगस्ट २०१८ या पाच महिन्यांसाठी आयएनएसटीएसने मंजूर केलेला टॅरिफ वसुल न झाल्याबद्धल अतिरिक्त वहन खर्च (कॅरींग कॉस्ट).

(क्यू) महसुली तफावत/(नफा) यांची निश्चिती वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ आणि २०१९-२० साठी एमवायटी रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदीनुसार निश्चित करण्यात आलेला आहे.

१.१० सन्माननीय आयोगाने केस क्र. ५० सन २०१६ मध्ये दिलेल्या आदेश दिनांकीत ०५.०७.२०१६ मुळे दुखावल्या गेलेल्या याचिकाकर्त्याने सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे अपील क्र. २६० सन २०१६ म्हणून नोंदणी झालेले अपील दाखल केले आहे. ह्या अपीलाची सुनावणी सन्माननीय एपीटीईएल यांच्यासमोर सुरु आहे. याचिकाकर्त्याने कथित अपीलामध्ये सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडून पुढील सवलतींसाठी दावा केलेला आहे.

(आर) विद्‌युतवहन, वाहिन्यांचा तिसरा संच आणि महसुलाची सुरुवात या संदर्भात याचिकाकर्त्याने सुचविल्यानुसार सीओडीला परवानगी देणे.

(एस) आयात करण्यात येणारी सामुग्री आणि किंमतीमधील बदल यांच्यासाठी एफईआरव्हीला परवानगी देणे.

(टी) भांडवली खर्चातील विविध घटकांना परवानगी देणे.

(यू) थकबाकी असणाऱ्या विलंबित भरणा शुल्काचा (डीपीसी) परवानगी असणाऱ्या एआरआरमध्ये घट करण्यासाठी बिगर-टॅरिफ उत्पन्न म्हणून विचार न करणे.

(व्ही) प्रत्यक्षातील कार्यान्वयन आणि देखभाल खर्चास मान्यता देणे.

(डब्ल्यू) दीर्घकालिक कर्जावरील प्रत्यक्ष व्याजाला मंजुरी देणे.

याशिवाय याचिकाकर्त्यांनी सन्माननीय आयोगाने केस क्र. १६९ सन २०१७ साठी दिलेल्या आदेश दिनांकीत १२.०९.२०१८ ला आव्हान देणारे अपील पुढील कारणांमुळे दाखल केलेले आहे. हे अपील सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडे अपील क्र. १८ सन २०१९ म्हणून नोंदविण्यात आले आहे:

१. अपील करणाऱ्यांनी वित्तिय वर्ष २०१५-१६ आणि वित्तिय वर्ष २०१६-१७ साठी दावा केलेल्या प्रत्यक्ष कार्यान्वयन व देखभाल खर्चाला परवानगी न देणे;

२. भांडवली खर्चाला परवानगी न देणे आणि त्यामुळे त्याचा वित्तिय वर्ष २०१५-१६ आणि वित्तिय वर्ष २०१६-१७ मधील समभागांवरील परतावा, दीर्घकालिक कर्जावरील व्याज आणि घसारा यांवर परिणामस्वरुप होणारा प्रभाव;

   ए) सामुग्रीवरील एफईआरव्हीला परवानगी न देणे

   बी) किंमतीमधील आवर्तन / किंमतीमधील फेरफार

   सी) कर्जपुरवठा आणि आयडीसी भार

   डी) अकोला II सबस्टेशन येथे अतिरिक्त बेज

   ई) ४०० केव्हीचा अतिरिक्त टॉवर

   एफ) बंद पडून राहिल्याचे आणि विलंब शुल्काचे भार

३. खेळत्या भांडवलाच्या साठ्यामध्ये घट आणि त्याच्या परिणामी अपील करणाऱ्यांनी वित्तिय वर्ष २०१५-१६ साठी दावा केलेल्या खेळत्या भांडवलावरील व्याजाला (आयओडब्ल्यूसी) परवानगी न देणे आणि वित्तिय वर्ष २०१६-१७ च्या आयओडब्ल्यूसीचा क्षमतेमधील वृद्धी म्हणून विचार करण्यास नकार देणे;

४. विलंबित भरणा अधिभाराचा / डिलेड पेमेन्ट सरचार्ज (डीपीसी) याचा बिगर-टॅरिफ उत्पन्न म्हणून विचार करणे;

५. आकस्मिक राखीवसाठी योगदान करण्यासाठी तरतूद न करणे;

६. कर्जावरील प्रत्यक्ष दीर्घकालिक व्याजासाठी तरतूद न करणे;

७. वित्तिय वर्ष २०१६-१७ साठी कमर्शियल ऑपरेशन डेट (सीओडी) पलिकडील एफईआरव्ही खर्चाच्या रिएम्बर्समेन्टचा दावा विचारात न घेणे;

८. वित्तिय वर्ष २०१५-१६ साठी (सेट-३च्या) दीर्घकालिक कर्जावरील व्याजाच्या हिशेबातील आकडेवारीची चूक; आणि

९. वित्तिय वर्ष २०१५-१६ साठी खेळत्या भांडवलाच्या आवश्यकतेचा भाग म्हणून देखभालीच्या अतिरिक्त (स्पेअर्स) रकमेचा हिशेब करताना अंकगणितातील चूक.

१.११ याचिकाकर्ता असे निवेदन करु शकतात की वर उल्लेख करणाऱ्या अपीलाबाबत सन्माननीय एपीटीईएल यांच्याकडून येणाऱ्या आदेशातील आपले कोणताही पूर्वाग्रह न ठेवता याचिकाकर्त्याने ही याचिका दाखल केलेली आहे.

वरील घटक विचारात घेता वित्तिय वर्ष २०१७-१८ ते वित्तिय वर्ष २०१८-१९ या द्विवितिय नियंत्रण कालावधीमधील याचिकाकर्त्याच्या ट्रुड अप एआरआरचा हिशेब खालील कोष्टकात दिलेला आहे. आमच्या दाव्याविषयी कोणताही पूर्वग्रह न ठेवता,

**कोष्टक १.१: वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ च्या एआरआरचे ट्रु-अप**

**(रु. कोटी)**

| अनु क्र. | तपशील | वित्तिय वर्ष २०१७-१८ | | | वित्तिय वर्ष २०१८-१९ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमटीपीआर | (प्रत्यक्ष) | ट्रु-अप आवश्यकता | एमटीपीआर | (प्रत्यक्ष) | ट्रु-अप आवश्यकता |
| १ | कार्यान्वयन व देखभाल खर्च | ९७.९० | ११३.२४ | १५.३४ | १०२.८३ | १२०.०२ | १७.२० |
| २ | घसारा | २८१.८७ | ३०६.९२ | २५.०५ | २८१.८७ | ३०७.३१ | २५.४४ |
| ३ | दीर्घकालिक कर्जावरील व्याज | ३४०.२० | ४२१.०७ | ८०.८७ | ३०८.४२ | ३८२.४९ | ७४.०७ |
| ४ | खेळते भांडवला वरील व्याज | १९.८२ | २२.५४ | २.७२ | १९.६५ | २१.२५ | १.६० |
| ५ | आयकर खर्च | ३१.६८ | ६३.६२ | ३१.९४ | ३१.६८ | ४०.०३ | ८.३५ |
| ६ | आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | १३.३८ | २९.१७ | १५.७९ | १३.४१ | २९.२२ | १५.८१ |
| ७ | **एकूण महसुली खर्च** | **७८४.८५** | **९५६.५७** | **१७१.७२** | **७५७.८५** | **९००.३१** | **१४२.४६** |

| अनु क्र. | तपशील | वित्तिय वर्ष २०१७-१८ | | | वित्तिय वर्ष २०१८-१९ | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | एमटीपीआर | (प्रत्यक्ष) | ड्रु-अप आवश्यकता | एमटीपीआर | (प्रत्यक्ष) | ड्रु-अप आवश्यकता |
| ८ | समभाग भांडवलावरील परतावा | २४९.४५ | २७१.५२ | २२.०७ | २४९.४५ | २७१.८७ | २२.४३ |
| ९ | **एकंदर महसुली आवश्यकता** | **१०३४.३०** | **१२२८.०९** | **१९३.७९** | **१००७.३०** | **११७२.१८** | **१६४.८९** |
| १० | वजा: बिगर-टॅरिफ उत्पन्न | ०.४९ | ०.०१ | -०.४८ | ०.९६ | ०.६६ | -०.३० |
| ११ | वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | | | | |
| १२ | वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | | | | |
| | **निव्वळ एकंदरीत महसुली आवश्यकता** | **१०३३.८१** | **१२२८.०८** | **१९४.२७** | **१००६.३४** | **११७१.५२** | **१६५.१९** |

१.१२ याचिकाकर्त्यांनी सन्माननीय आयोगाने केस क्र. ३०३ सन २०१८ बाबत दिलेल्या १८.१२.२०१८ तारखेच्या आदेशानुसार याचिकाकर्त्याला आर्थिक परिणामांसाठी पुढील एमवायटी याचिकेद्वारे दावा करण्याचे आदेश दिलेल्या वहन खर्चांसह २०१५-१६ दरम्यानच्या सीओडी पलिकडील कर्जाच्या एफईआरव्हीसाठी एमईजीपीटीसीएलच्या दाव्याला परवानगी दिलेली असल्यामुळे त्यासाठी आर्थिक परिणामांबाबत देखील दावा केलेला आहे.

१.१३ याचिकाकर्ता एमवायटी रेग्युलेशन २०१५ च्या रेग्युलेशन क्र. ५७.२ कडे लक्ष वेधू इच्छितात, ज्यामध्ये उपलब्धतेच्या ९९% पलिकडील वार्षिक उपलब्धता गाठल्यास इन्सेन्टिव्ह उपलब्ध असण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. ही गोष्ट विचारात घेता प्रत्यक्ष उपलब्धता ही उद्दिष्ट उपलब्धतेच्या ९९% पलिकडे गेलेली असल्यामुळे याचिकाकर्त्याने वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ साठी इन्सेन्टिव्ह मिळण्यासाठी दावा

केलेला आहे. या रेग्युलेशनमध्ये अशीही तरतूद आहे की सदर इन्सेन्टिव्हची उपलब्धता ही ९९.७५% पर्यंतच्या उपलब्धतेसाठी देण्यात आली पाहिजे.

१.१४ वर्ष २०१७-१८ आणि २०१८-१९ साठी याचिकाकर्त्याची प्रत्यक्ष उपलब्धता अनुक्रमे ९९.७७% आणि ९९.७६% एवढी आहे. एमएसएलडीसी कडून याचिकाकर्त्याला देण्यात आलेले वार्षिक उपलब्धता प्रमाणपत्र हे **परिशिष्ट ३ आणि परिशिष्ट ४** म्हणून याचिकेसोबत जोडलेले आहे.

**कोष्टक १.२: ट्रू-अप सारांश**

**(रु. कोटी)**

| अनु. क्र. | तपशील | फॉर्म्यूला | वित्तिय वर्ष २०१७-१८ चे प्रत्यक्ष आकडे | वित्तिय वर्ष २०१८-१९ चे प्रत्यक्ष आकडे |
|---|---|---|---|---|
| १ | एमटीपीआर आदेशामध्ये मंजूर एआरआर | ए | १०३३.८१ | १००६.३४ |
| २ | ग्राहकाकडे देण्यात यावयाच्या नियंत्रणाबाहेरील घटकामुळे नफा (तोटा) | बी | १९२.१० | १६३.५८ |
| ३ | ग्राहकाकडे देण्यात यावयाच्या नियंत्रणातील घटकांमुळे १/३ नफा (तोटा) | सी | ०.७२ | १.१७ |
| **४** | **ट्रुड-अप एआरआर** | **डी = ए+बी+सी** | **१२२६.६३** | **११७१.०९** |
| ५ | उपलब्धतेची प्रोत्साहन राशी | ई | ९.३० | ८.८८ |
| ६ | वित्तिय वर्ष २०१७-१८ मध्ये एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | एफ | ४२.२१ | |
| ८ | वित्तिय वर्ष २०१७-१८ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | जी | १.८४ | |
| ९ | वित्तिय वर्ष २०१८-१९ मध्ये एआरआरच्या वसुलीमध्ये | एच | | ३८.३९ |

| अनु. क्र. | तपशील | फॉर्म्यूला | वित्तिय वर्ष २०१७-१८ चे प्रत्यक्ष आकडे | वित्तिय वर्ष २०१८-१९ चे प्रत्यक्ष आकडे |
|---|---|---|---|---|
| | झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | | | |
| १० | वित्तिय वर्ष २०१८-१९ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | आय | | ०.८८ |
| ११ | संपूर्ण वर्षात टीएसयूजकडुन वसुल केलेला एकंदर महसुल | जे | १०८७.३१ | ९३४.०३ |
| | | | | |
| १४ | **महसुली तफावत / (नफा)** | **के=डी+ई+एफ+जी+एच+आय+जे** | **१९२.६८** | **२८५.२१** |

१.१५ वित्तिय वर्ष २०१९-२० च्या बाबतीत एमईजीपीटीसीएल यांनी एमवायटी आदेशामधील मंजुर झालेल्या एआरआरची दुसऱ्या अर्धवर्षाचे अंदाज आणि अलेखापरिक्षित अर्धवार्षिक लेखा यांच्या आधारे पहिल्या अर्धवर्षाच्या प्रत्यक्ष कामगिरीबरोबर तुलना केलेली आहे. वित्तिय वर्ष २०१९-२० चे मंजुर झालेले आणि सुधारीत एआरआर यांची तुलना खालील कोष्टकामध्ये करण्यात आलेली आहे.

**कोष्टक क्र. १.३: वित्तिय वर्ष २०१९-२० च्या मंजूर झालेल्या व अंदाजे एआरआरची तुलना**

**(रु. कोटी)**

| तपशील | वित्तिय वर्ष २०१९-२० | | |
|---|---|---|---|
| | मंजूर (एमटीपीआर) | अंदाजे | ट्रु-अप आवश्यकता |
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | १०८.१० | ११५.८५ | ७.७४ |
| घसाऱ्यापोटी खर्च | २८१.८७ | ३०८.३५ | २६.४८ |
| दीर्घकालीन भांडवली कर्जावरील व्याज | २७५.५२ | ३४२.२९ | ६६.७७ |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज | १७.४४ | २१.२८ | ३.८४ |

| तपशील | वित्तिय वर्ष २०१९-२० | | |
|---|---|---|---|
| | मंजूर (एमटीपीआर) | अंदाजे | ट्रू-अप आवश्यकता |
| आयकर | ३१.६८ | ७४.९४ | ४३.४६ |
| आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | १३.४१ | २९.२५ | १५.८४ |
| **एकूण महसुली खर्च** | **७२८.०३** | **८९१.९६** | **१६३.९३** |
| समभाग भांडवलावरील परतावा | २४९.४५ | २७२.७९ | २३.३५ |
| **एकंदर महसुली आवश्यकता** | **९७७.४८** | **११६४.७५** | **१८७.२७** |
| वजा: बिगर-टॅरिफ उत्पन्न | १.९१ | | -१.९१ |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | |
| **पारेषण टॅरिफपासून एकंदर महसुली आवश्यकता** | **९७५.५७** | **११६४.७५** | **१८९.१८** |

१.१६ याचिकाकर्त्याने सध्या वित्तिय वर्ष २०१९-२० साठी कोणत्याही प्रोत्साहनपर राशी व वहन खर्च यांचा दावा केलेला नाही. संबंधित वर्षाच्या अंतिम जुळवणीच्या (ट्रू-अप) वेळेस वित्तिय वर्ष २०१९-२० च्या प्रोत्साहनपर राशी आणि वहन खर्च यांच्यासाठी दावा करण्यात येईल.

१.१७ वित्तिय वर्ष २०२०-२१ पासून वित्तिय वर्ष २०२४-२५ पर्यंतच्या चौथा नियंत्रण कालावधीसाठी एआरआरचा अंदाज खालील कोष्टकामध्ये दिलेला आहे:

**कोष्टक १.४: वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि वित्तिय वर्ष २०२४-२५ साठी एआरआरचा सुधारीत अंदाज**

**(रु. कोटी)**

| तपशील | वित्तिय वर्ष २०२०-२१ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२१-२२ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२२-२३ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२३-२४ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२४-२५ (अंदाजे) |
|---|---|---|---|---|---|
| कार्यान्वयन व देखभाल खर्च | ११०.९८ | ११५.३३ | ११९.९३ | १२४.७० | १२९.६४ |
| घसाऱ्यापोटी खर्च | ३०९.२३ | ३०९.२३ | ३०९.२३ | ३०९.२३ | ३०९.२३ |

| तपशील | वित्तिय वर्ष २०२०-२१ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२१-२२ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२२-२३ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२३-२४ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२४-२५ (अंदाजे) |
|---|---|---|---|---|---|
| भांडवली कर्जावरील व्याज | ३०२.९० | २६१.९३ | २२०.९६ | १७९.९८ | १३९.०१ |
| खेळते भांडवल आणि ग्राहकांचे सिक्युरीटी डिपॉझिट यावरील व्याज | २०.३२ | १९.८९ | १९.४७ | १९.०६ | १८.६४ |
| आयकर | | | | | |
| आकस्मिक निधीसाठी राखीव योगदान | २९.४२ | २९.४२ | २९.४२ | २९.४२ | २९.४२ |
| **एकूण महसुली खर्च** | **७७२.८४** | **७३५.७९** | **६९९.००** | **६६२.३८** | **६२५.९४** |
| अधिक: समभाग भांडवलावरील परतावा | ३१४.९६ | ३१४.९६ | ३१४.९६ | ३१४.९६ | ३१४.९६ |
| **एकंदर महसुली आवश्यकता** | **१०८७.८०** | **१०५०.७५** | **१०१३.९६** | **९७७.३४** | **९४०.९०** |
| वजा: बिगर टॅरिफ उत्पन्न | | | | | |
| वजा: इतर व्यवसायापासून उत्पन्न | | | | | |
| वजा: ओपन ॲक्सेस चार्जेसपासून उत्पन्न | | | | | |

| तपशील | वित्तिय वर्ष २०२०-२१ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२१-२२ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२२-२३ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२३-२४ (अंदाजे) | वित्तिय वर्ष २०२४-२५ (अंदाजे) |
|---|---|---|---|---|---|
| **पारेषणाकडून एकंदर महसुली आवश्यकता** | **१०८७.८०** | **१०५०.७५** | **१०१३.९६** | **९७७.३४** | **९४०.९०** |

१.१८ याचिकाकर्त्याला असे निवेदन करावयाचे आहे की वित्तिय वर्ष २०२०-२१ चा संचित एआरआर (महसुली तफावत/(नफा) यांचा समावेश असणारा) खालीलप्रमाणे आहे.

**कोष्टक १.५: वित्तिय वर्ष २०२०-२१ आणि २०२१-२२ साठी संचित एआरआर**

**(रु. कोटी)**

| तपशील | | वित्तिय वर्ष २०२०-२१ | वित्तिय वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| सदर वर्षासाठी स्वतंत्र एआरआर | ए | १०८७.८० | १०५०.७५ |
| महसुली तफावत/(नफा) - वित्तिय वर्ष २०१७-१८ | बी=सी+डी+ई+एफ | १९२.६८ | - |
| उपलब्धतेची प्रोत्साहन राशी | सी | ९.३० | - |
| एआरआरचा महसुली तफावत/(नफा) | डी | १३९.३२ | - |
| वित्तिय वर्ष २०१७-१८ मध्ये एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | ई | ४२.२१ | - |
| वित्तिय वर्ष २०१७-१८ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | एफ | १.८४ | - |
| महसुली तफावत/(नफा) - वित्तिय वर्ष २०१८-१९ | जी=एच+आय+जे+के+एल | २८५.२० | - |
| उपलब्धतेची प्रोत्साहन राशी | एच | ८.८८ | - |
| एआरआरचा महसुली तफावत/(नफा) | आय | २३७.०६ | - |
| वित्तिय वर्ष २०१८-१९ मध्ये ट्रु-अप एआरआरच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | के | ३८.३९ | - |
| वित्तिय वर्ष २०१८-१९ इन्सेन्टिव्हच्या वसुलीमध्ये झालेल्या विलंबाबद्दल वहन केलेला खर्च | आय | ०.८८ | - |
| महसुली तफावत/(नफा) - कमी प्रमाणातील वसुलीच्या घटना | एम = एन+ओ | ६४.१४ | - |

| तपशील | | वित्तिय वर्ष २०२०-२१ | वित्तिय वर्ष २०२१-२२ |
|---|---|---|---|
| वित्तिय वर्ष २०१८-१९ मध्ये वसुल करण्यात यावयाच्या रकमेची कमी प्रमाणात झालेली वसुली | एन | ५४.७३ | |
| कमी प्रमाणात झालेल्या वसुलीचा वहनखर्च | ओ | ९.४१ | |
| महसुली तफावत/(नफा) - वित्तिय वर्ष २०१९-२० | पी | १८९.१८ | |
| महसुली तफावत/(नफा) - टॅरिफमधील एफईआरव्ही वसुली - पुनरावलोकन याचिकेचा परिणाम | क्यू = आर+एस+टी+यू | ३७.९९ | |
| टॅरिफमधील एफईआरव्ही वसुली - वित्तिय वर्ष २०१५-१६ | आर | २०.४० | |
| वित्तिय वर्ष २०१५-१६ च्या वसुल न झालेल्या एफईआरव्हीचा वहन खर्च | एस | ९.७३ | |
| टॅरिफमधील एफईआरव्ही वसुली - वित्तिय वर्ष २०१६-१७ | टी | ५.८२ | |
| वित्तिय वर्ष २०१६-१७ च्या वसुल न झालेल्या एफईआरव्हीचा वहन खर्च | यू | २.०४ | |
| **महसुली तफावत/(नफा)** | **व्ही=बी+जी+एम+पी** | ७६९.२० | - |
| **संचित एआरआर वसुली** | **डब्ल्यू** | १८५७.०० | १०५०.७५ |

१.१९ याचिकाकर्त्याने या याचिकेच्या प्रकरण ५ च्या संबंधित विभागात अधोरेखित केल्यानुसार योग्य त्या चलन फुगवटा निर्देशांकाचा विचार करून वित्तिय वर्ष २०१८-१९ च्या प्रत्यक्ष/अंदाजे कामकाज व देखभाल खर्चाचे प्रक्षेपण करून एमवायटी रेग्युलेशन्स २०१९ मध्ये मंजूर करण्यात आलेल्या निकषांनुसार नवीन नियंत्रण कालावधीमधील कामकाज आणि देखभाल खर्चाच्या फेरफाराविषयी दावा केलेला आहे. एमवायटी रेग्युलेशन्स २०१९ मधील "अडचणी दूर करण्याचे अधिकार" ह्या रेग्युलेशन क्र. १०६ मधील अधिकारांचा वापर करून ह्या फेरफारांना मंजुरी द्यावी अशी सन्माननीय आयोगाला विनंती करण्यात येत आहे.

**सन्माननीय आयोगाकडे प्रार्थना**

वरील वस्तुस्थिती आणि परिस्थिती विचारात घेऊन सन्माननीय आयोगाने पुढील गोष्टी कराव्यात अशी प्रार्थना याचिकाकर्ता करीत आहे:

(ए) वर्तमान याचिका दाखल करून घेणे.

(बी) ह्या याचिकेमध्ये दावा केलेला भांडवली खर्च मंजुर करण्यात यावा.

(सी) या याचिकेमध्ये दावा केल्यानुसार कार्यान्वयन व देखभाल खर्चाला मंजुरी देणे.

(डी) केस क्र. २६५ सन २०१८ मधील आयएनएसटीएस आदेश दिनांकीत १२.०९.२०१८ द्वारे वर्ष २०१८-१९ च्या मंजुर झालेल्या महसुलाच्या वसुलीला ०१.०९.२०१८ पासून प्रारंभ झालेला असल्यामुळे वर्ष २०१८-१९ च्या एआरआरच्या कमी प्रमाणात झालेल्या वसुलीला वहनखर्चासह मान्यता देण्यात यावी.

(ई) सन्माननीय आयोगाच्या केस क्र. ३०३ सन २०१८ बाबतच्या १८.१२.२०१८ च्या आदेशाच्या अनुसार वहनखर्चासह आर्थिक परिणामांना (रिलिफ) मंजुरी देण्यात यावी.

(एफ) वित्तिय वर्ष २०१७-१८ आणि वित्तिय वर्ष २०१८-१९ साठी वहन खर्च आणि इन्सेन्टिव्ह यांच्याबरोबरच एआरआरच्या ट्रु-अपला मंजुरी देणे.

(जी) या याचिकेमध्ये सूचित केल्यानुसार वित्तिय वर्ष २०१९-२० च्या एआरआरच्या तात्पुरत्या ट्रु-अपला मंजुरी देणे.

(एच) या याचिकेमध्ये निर्देशित केल्यानुसार वित्तिय वर्ष २०२०-२१ ते वित्तिय वर्ष २०२४-२५ ह्या कालावधीच्या एआरआरला मंजुरी देण्यात यावी.

(आय) या याचिकेमध्ये नमूद केल्यानुसार कोणत्याही कारणासाठी, ही याचिका सादर करण्यास, कोणत्याही प्रकारे विलंब झाला असल्यास त्याला क्षमा करणे.

(जे) अनवधानाने कोणत्याही त्रुटी/चुका/कमतरता राहून गेल्या असल्यास त्यांना क्षमा करणे आणि पुढील तारखेस आवश्यकता वाटेल त्यानुसार या सादरीकरणामध्ये वाढ/बदल/दुरुस्ती/फेरफार करण्यासाठी व त्यानंतर पुन्हा ती सादर करणे यासाठी एमईजीपीटीसीएल यांना परवानगी देणे.

(के) सन्माननीय आयोगाला देण्यास योग्य वाटेल अशी इतर कोणतीही सूट, आदेश किंवा निर्देश देण्यास परवानगी देणे.

(एल) या प्रकरणातील वस्तुस्थिती आणि परिस्थिती लक्षात घेऊन सन्माननीय आयोगाला उचित आणि योग्य वाटतील अशाप्रकारे यापुढील आदेश मंजूर करणे.